माहे डिसेंबर-२०१८ ते जानेवारी-२०१९ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ५ आणि नवनिर्मित आरमोरी व शेंदुर्णी या एकूण ७ नगर परिषदा/नगरपंचायतींसाठी प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम-२०१८.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य

क्रमांक रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.१२/का.०६,
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०८/०८/२०१८.

प्रति,

जिल्हाधिकारी,
जळगाव, नांदेड, वाशिम, यवतमाळ,
नागपूर, चंद्रपूर व गडचिरोली.

**विषय :- डिसेंबर-२०१८ ते जोनवारी-२०१९ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ५ आणि नवनिर्मित आरमोरी व शेंदुर्णी या एकूण ७ नगरपरिषदा/नगरपंचायतींसाठी प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम-२०१८.**

संदर्भ:- १) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.७ (२)/का-६, दि.२४/०७/२०१५ चे आदेश.
२) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.७/का-६, दि.०७/०५/२०१६ चे आदेश.
३) महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) २०१७ चा अधिनियम क्रमांक ९, दि.१२/०१/२०१७.
४) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१७, दि.०२/११/२०१७.
५) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, (सुधारणा) अधिसूचना दि.१३/११/२०१७.
६) महाराष्ट्र नगर परिषदा व नगर पंचायती (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे व त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०१६, दि.१३/०६/२०१६
७) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.१०/का-६, दि.१५/०६/२०१६ चे आदेश.
८) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक १२/०७/२०१८ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

माहे डिसेंबर-२०१८ ते जोनवारी-२०१९ या कालावधीत मुदत संपुष्टात येणाऱ्या आपल्या जिल्ह्यातील लोहा, नेर-नबाबपूर, रिसोड व ब्रम्हपुरी या ४ नगर परिषदा व मौदा नगर पंचायत अशा एकूण ५ नगर परिषदा / नगर पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांची मुदत

संपण्यापूर्वी घेणे आवश्यक आहे. तसेच नवनिर्मित **आरमोरी** नगर परिषद व **शेंदुर्णी** नगर पंचायत यांच्या स्थापनेचा दिनांक विचारात घेता यांच्या सार्वत्रिक निवडणुका लवकरात लवकर घेणे आवश्यक आहे.

२. महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम ९ (२) मधील तरतुदींनुसार उपरोक्त नगर परिषदा/नगर पंचायतींची सदस्य संख्या संबंधीत विभागीय आयुक्त यांनी शासन राजपत्रात प्रसिध्द केली आहे.

३. आणि ज्याअर्थी, शासनाने दिनांक १९/०५/२०१६ व दिनांक ३०/०८/२०१६ महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश २०१६, (सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक १६) अन्वये नगर परिषदांमध्ये एक सदस्यीयऐवजी बहुसदस्यीय प्रभाग पध्दती लागू केली आहे. तसेच दि.१३ जून, २०१६ रोजी, महाराष्ट्र नगर परिषदा (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०१६ पारित केले आहेत. त्या अनुषंगाने आयोगाने नगर परिषदा/नगर पंचायतींच्या प्रभाग रचनेबाबतचे सुधारित आदेश दिनांक १५/०६/२०१६ रोजी पारित केले आहेत. त्यामुळे आता अधिनियमातील तरतुदींनुसार प्रभाग रचना तयार करावी.

४. आणि ज्याअर्थी, शासनाने दिनांक ०२/११/२०१७ रोजी महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नागरी (सुधारणा) अध्यादेश २०१७, (सन २०१७ चा अध्यादेश क्रमांक २५) अन्वये नगरपंचायतींमधील अध्यक्ष पदांच्या निवडणूका थेट जनतेमधून करण्याची अधिनियमात तरतूद लागू केली आहे. आयोगाने नगर परिषदा/नगरपंचायतींच्या प्रभाग रचनेबाबतचे सुधारित आदेश दिनांक १५/०६/२०१६ रोजी पारित केले आहेत. **नगर पंचायातींच्या सार्वत्रिक निवडणुका या एक सदस्यीय पध्दतीनेच घ्यावयाच्या आहेत.** त्यामुळे आता अधिनियमातील तरतुदींनुसार प्रभाग रचना तयार करावी.

५. आता या पत्राद्वारे माहे डिसेंबर-२०१८ ते जानेवारी-२०१९ या कालावधीत मुदती संपणाऱ्या आणि नवनिर्मित **अरमोरी** व **शेंदुर्णी** या नगर परिषदा/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम परिशिष्ट-१ नुसार देण्यात येत आहे. **प्रभाग रचनेसाठी आवश्यक असलेल्या आदेशांच्या प्रती पत्रासोबत पाठविण्यात येत आहेत.**

६. प्रभाग रचना अंतिम करण्याबाबतचे यापूर्वीचे संबंधित आदेश अधिक्रमित करुन राज्य निवडणूक आयुक्त यांनी त्यांचे अधिकार रानिआ आदेश क्र.रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.०७/का.६, दि.०७/०५/२०१६ अन्वये संबंधित मुख्याधिकारी, जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त यांना प्रदान केले आहेत.

७. प्रभाग रचनेचे तीन मुख्य टप्पे राहणार आहेत:-

(अ) आरक्षणासह प्रारुप प्रभाग रचना करणे,

(ब) हरकती व सूचनांवरील सुनावणी घेणे व

(क) अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करणे.

८. प्रभाग रचना करताना प्रामुख्याने खालील बाबींवर लक्ष देणे आवश्यक आहे. :-

(i) राज्य निवडणूक आयोगाकडे आपणाकडून प्राप्त झालेल्या माहिती नुसार परिशिष्ट-३ मध्ये नमूद केलेल्या ५ नगर परिषदा/नगरपंचायतीची मुदत डिसेंबर-२०१८ ते जानेवारी-२०१९ या कालावधीत संपुष्टात येणार आहे. याबाबत आपल्या स्तरावर पुन्हा खात्री करण्यात यावी. त्यामुध्ये त्रुटी/तफावत असल्यास ती राज्य निवडणूक आयोगास तात्काळ कळविण्यात यावी. वरील कालावधीत मुदत संपणाऱ्या एकाही नगर परिषद/नगर पंचायतीची निवडणूक तिची मुदत संपण्यापूर्वी न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

(ii) या निवडणुकांकरिता जनगणना कार्यालयाची सन २०११ च्या जनगणनेची आकडेवारी वापरण्यात यावी. सोबतच्या परिशिष्ट-२ मधील नमुन्यानुसार **नगर परिषद/नगर पंचायतीचे मुख्याधिकारी यांचेकडून प्रमाणपत्र घेण्यात यावे.**

(iii) प्रभाग रचना करताना गुगल मॅप वापरुन, त्यावर प्रगणक गट दर्शविण्यात यावेत.

(iv) मुख्याधिकारी यांनी अनुसूचित जातीच्या/अनुसूचित जमातीच्या आरक्षणासह प्रारूप प्रभाग रचना प्रस्ताव तयार करावा.

(v) अनुसूचित जाती मधील महिला, अनुसूचित जमातीमधील महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील

महिला व सर्वसाधारण महिला याकरिता सोडत, जिल्हाधिकारी यांनी नियुक्त केलेल्या उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या कार्यक्रमानुसार काढावी. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी एकच पद देय असल्यास याबाबत आयोगाच्या प्रभाग रचनेच्या दि.१५/०६/२०१६ च्या आदेशातील परिच्छेद क्र. २ (अ) व २ (ब) मधील तरतुदींनुसार कार्यवाही करावी.

(vi) सोडतीसाठी, फिरणारा पारदर्शक ड्रम/काचेचा बॉक्स वापरावा व त्यामध्ये टाकावयाच्या चिठ्ठयांचा आकार १५ सेंमी x १५ सेंमी पेक्षा जास्त नसावा. चिठ्ठीवरील अनुक्रमांक बाहेरुन दिसणार नाहीत याची दक्षता घ्यावी. त्यावर लावावयाचे रबर बॅंड एकाच रंगाचे असावेत. शक्य असल्यास सोडतीचे थेट प्रक्षेपण स्थानिक केबल टि.व्ही. वर करावे.

(vii) बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार प्रभागरचना आणि आरक्षण राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रं. रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.१०/का.६, दिनांक १५/०६/२०१६ नुसार करावी. या आदेशानुसार विहित केलेल्या परिशिष्ट १ ते ८ नुसारची माहिती तयार करुन ती सर्व जनतेच्या निदर्शनास आणण्याकरिता आवश्यक ती उपाय योजना करावी.

(viii) सदस्य पदाच्या आरक्षणाच्या सोडतीकरिता नोटीस, मतदारांच्या माहितीसाठी हरकती व सूचना, अंतिम प्रभाग रचना इत्यादी याकरिता मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी देण्यात यावी. उदा.

(a) स्थानिक वृत्तपत्रे, केबल टी.व्हि. वर

(b) नगर परिषदा/नगरपंचायतींच्या प्रभाग समितीचे व इतर कार्यालयातील सूचना फलक,

(c) जिल्हाधिकारी व तहसील कार्यालयाचे सूचना फलक

(d) स्थानिक पातळीवर इतर माध्यमे.

(e) जिल्हाधिकारी व नगर परिषद/नगर पंचायतीच्या संकेत स्थळावर इत्यादी

(ix) प्रारूप प्रभाग रचना व अंतीम प्रभाग रचना जिल्हाधिकारी व नगर परिषद/नगर पंचायतींच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणे बंधनकारक राहील.

(x) सोडतीच्यावेळी प्रारुप प्रभाग रचनेचा नकाशा व त्याच्या चतु:सिमा, सोडतीसाठी येणाऱ्या नागरिकांना सहज दिसेल अशा ठिकाणी लावून ठेवावा.

(x) सोडत, जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली होईल. प्रभाग रचना, आरक्षण व सोडत इत्यादी पासून अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यापर्यंतच्या कार्यवाहीवर नियंत्रण ठेवण्याकरीता उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी. सोडतीची रंगीत तालीम फक्त संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांचे उपस्थितीत घ्यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(स्वाक्षरी) ०८.०८.२०१८

( संजय सावंत)
कक्ष अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

प्रत:-

१. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
३. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर.
४. मुख्याधिकारी, लोहा, नेर-नबाबपूर, रिसोड, ब्रम्हपुरी, आरमोरी, मौदा व शेंदुर्णी नगर परिषदा/नगर पंचायती.
५. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी व कार्यासने
६. राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील
७. निवड नस्ती/कार्या.६

# प्रभाग रचना, आरक्षण व सोडत कार्यक्रम

## परिशिष्ट -१

**डिसेंबर-२०१८ ते जानेवारी-२०१९ या कालावधीत मुदती संपणाऱ्या आणि नवनिर्मित आरमोरी व शेंदुर्णी या नगरपरिषदा/नगरपंचायतींसाठी प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम -२०१८.**

**(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.१२/का-०६, दि. ०८/०८/२०१८ सोबतचे परिशिष्ट.)**

| अ. क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे. | टप्पा सुरु करण्याचा / संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | **अ) प्रारुप प्रभाग रचना आरक्षणासह** | | |
| १. | प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (नगर परिषदेच्या प्रभागांची संख्या, त्यांची प्रभागनिहाय एकूण व अनुसूचित जाती तसेच अनुसूचित जमातीची २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या, क्षेत्र, सीमांकन, नकाशा, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आरक्षण यासह) जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणे | मुख्याधिकारी | २०/०८/२०१८ (सोमवार) (पर्यंत) |
| २. | प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता देणे. | जिल्हाधिकारी | २४/०८/२०१८ (शुक्रवार) (पर्यंत) |
| ३. | सदस्य पदांच्या आरक्षणाच्या सोडतीकरिता नोटीस प्रसिध्द करणे **(जिल्हाधिकारी व नगर परिषद/नगरपंचायतीच्या वेबसाईटसह)** | जिल्हाधिकारी | २८/०८/२०१८ (मंगळवार) |
| ४. | नगर परिषद/नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या आरक्षणाची सोडत काढणे. (अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीमधील महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व त्यामधील महिला तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील महिला) | मुख्याधिकारी | ३१/०८/२०१८ (शुक्रवार) |
| | **ब) हरकती व सूचना तसेच सुनावणी** | | |
| १. | प्रारुप प्रभाग रचना, प्रभागदर्शक नकाशे व सदस्य पदांच्या आरक्षणाची (अधिसूचना कलम १० नुसार) रहिवाश्यांच्या माहितीसाठी व हरकती तसेच सूचना मागविणेकरिता वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगर परिषद/नगरपंचायतीच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | ०४/०९/२०१८ (मंगळवार) पर्यंत |
| २. | हरकती व सूचना मागविण्याचा कालावधी | | ०४/०९/२०१८ (मंगळवार) ते ११/०९/२०१८ (मंगळवार) पर्यंत |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी देणे. | जिल्हाधिकारी | १५/०९/२०१८ (शनिवार) पर्यंत |
| ४. | हरकती व सूचनांच्या अनुषंगाने अभिप्राय देऊन **संबंधित** विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, यांचेकडे अहवाल पाठविणे | जिल्हाधिकारी | १९/०९/२०१८ (बुधवार) पर्यंत |
| ५. | अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे. | संबंधित विभागीय आयुक्त | २५/०९/२०१८ (मंगळवार) पर्यंत |
| **क) अंतिम प्रभाग रचना (प्रभाग निहाय एकूण लोकसंख्या, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या तसेच आरक्षणासह)** | | | |
| १. | अधिनियमातील कलम १० नुसार अंतिम अधिसूचना वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगर परिषद/नगरपंचायतीच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | जिल्हाधिकारी | २८/०९/२०१८ (शुक्रवार) पर्यंत |

टीपः- प्रत्येक नगर परिषद/नगर पंचायतीची प्रभाग रचना, आरक्षण व सोडत इत्यादी ते अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यापर्यंतच्या कामावर नियंत्रण ठेवण्याकरीता जिल्हाधिकारी यांनी उप जिल्हाधिकारीपेक्षा कमी नसलेल्या दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी.

आपला,

०८.०८.२०१८

(संजय सावंत)
कक्ष अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

# परिशिष्ट -२

## प्रमाणपत्र - प्रारुप प्रभाग रचना

जिल्हयाचे नाव - ........................
नगर परिषद/नगरपंचायतीचे नाव - .......................

मी.............................. मुख्याधिकारी, .....................नगरपरिषद/नगरपंचायत, जिल्हा-........... असे प्रमाणित करतो की, ............... नगर परिषद/नगरपंचायत २०१८ च्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेली प्रारुप प्रभाग रचना खालील दक्षता घेऊन करण्यात आलेली आहे.

१) सन २०११ च्या लोकसंख्येची आकडेवारी व प्रगणक गटांचे नकाशे जनगणना कार्यालयाकडून प्राप्त करुन घेतलेले आहेत. ज्या ठिकाणी जनगणना कार्यालयाकडून माहिती प्राप्त झालेली नाही. तेथे २०११ ची लोकसंख्या सर्वेक्षण करुन निश्चित करण्यात आलेली आहे. याबाबत आवश्यक ते प्रमाणपत्र संचालक, जनगणना कार्यालय यांच्याकडून घेण्यात आलेले आहे. (*)

२) प्रभाग रचना करण्याकरीता गुगल मॅप व जनगणना कार्यालयाकडील प्राप्त प्रगणक गट नकाशांचा वापर करण्यात आलेला आहे.

३) प्रभाग रचना तयार करताना अधिनियम, नियम तसेच राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, निदेश व सूचना यांचे तंतोतंत पालन करण्यात आलेले आहे.

स्वाक्षरी

ठिकाणः----------------- (नाव ------------------------------)

दिनांकः--------------- मुख्याधिकारी,...... नगर परिषद/नगरपंचायत

जिल्हा- ................

(*) सदर मजकूर आवश्यक असेल तेथेच नमूद करण्यात यावा.

D:\HENDARE - २०१७\Arni N P - Copy.doc

# नगर परिषदा / नगर पंचायतींची नावे

## परिशिष्ट -३ ( सार्वत्रिक निवडणुकांसाठी)

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.१२/का-६, दि. ०८/०८/२०१८ सोबतचे सहपत्र.)

| अ.क्र. | जिल्हा | नगर परिषदा/नगरपंचायतींचे नावे | मुदत समाप्तीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | जळगाव | शेंदुर्णी | नवनिर्मित |
| २ | नांदेड | लोहा | १७/१२/२०१८ |
| ३ | यवतमाळ | नेर-नबाबपूर | १५/१२/२०१८ |
| ४ | वाशिम | रिसोड | २३/०१/२०१९ |
| ५ | नागपूर | मौदा | १३/०१/२०१९ |
| ६ | चंद्रपूर | ब्रम्हपुरी | ३१/०१/२०१९ |
| ७ | गडचिरोली | आरमोरी | नवनिर्मित |